# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १०.१.२००६ रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२०) इतिवृत्त**

मंगळवार दिनांक १० जनेवारी २००६ रोजे स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.काशीनाथ कोकाटे** यांचे अध्यक्षतेखाली ''मलिक अंबर स्थायी समिती सभागृह '' येथे दुपारी १.३५ वाज्ता ''वंदे मातरम्'' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) श्री. साहेबराव राणुबा कावडे
(०२) सौ. खंदारे वंदना प्रकाश
(०३) श्री. गवळी रविकान्त काशीनाथ
(०४) सौ. जधव संगिता विठ्ठलराव
(०५) सौ. दलाल लता श्रीनिवास
(०६) श्री. दाभाडे मिलींद यशवंत
(०७) श्री. दिलीप नारायण गायकवाड
(०८) श्री. पांडे विनायक प्रभाकर
(०९) श्री. बारवाल गजनन रामकिशन
(१०) श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
(११) श्री. विसपुते शशांक दामोधर
(१२) श्री. वैद्य रेणूकादास दत्तोपंत

**संवाद :**

श्री.गजनन बारवाल : मागिल बैठकीत अधिकारी कर्मचारी यांना मोबाईल फोन व वाहन भत्ता देण्या संदर्भात निर्णय घेतलेला होता. त्यात कनिष्ठ अभियंता याचाही समावेश असावा असा निर्णय दिलेला होता. परंतू अदयाप ती सुविधा देण्यात आलेली नाही. तसेच मा.महापौर यांचे निवासस्थानावर जे कर्मचारी स्थायी असून ते नियमित काम करतात त्यांना केलेल्या जस्तीचा कामाचा मोबदला मिळत नाही. मा.आयुक्त यांचे निवासस्थानावर जेकर्मचारी काम करतात त्यांना जस्तीचा कामाचा मोबदला दिला जतो. ती तफावत कशासाठी, खुलासा करण्यात यावा.

श्री. कवरसिंग बैनाडे : आजच्या वृत्तपत्रात आले की महानगरपालिकेच्या माध्यमातून शहर बसेस धावणार आहे. परंतू याची माहिती या सभागृहाला देण्यात आलेली नाही. शहर बसेस वर काही जहीरात राहणार आहे का तसेच त्या जहिरातीपासून जे महसूल मिळेल तो महानगरपालिकस की, संबधीत ठेकेदार यांना मिळणार आहे याचाही खूलासा व्हावा.तसेच बसस्टॉपचे बांधकाम होणार आहे. या बसस्टॉपवर जी जहीरात राहणार आहे बाजूला लहान दुकान असणार आहे त्या माध्यमातून जे महसूल मिळणार आहे तो महापालिकेस की संबधीत ठेकेदार यांना मिळणार आहे. तसेच शहर बस सेवा ही महानगरपालिकच्या मार्फत चालविण्यात येणार आहे की संबधीत ठेकेदार यांचे मार्फत याचाही खुलासा करावा. आपणांस किती टक्केवारी मिळेल? व्यवसायात भागीदारी आहे का?

अति. शहर अभियंता : महापालिकेच्या अंतर्गत शहर बस सेवा सुरू करण्याच्या बाबतीत महानगरपालिकेने मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम

२५ नूसार महानगरपालिकेने शहर बस सेवा चालवावी अशी तरतूद आहे. त्या प्रमाणे सर्वसाधारण सभेने धोरणात्मक निर्णय म्हणून यास मान्यता दिलेली होती. व त्यानूसार खाजगी संस्थेमार्फत निविदा मागवून त्या निविदा मंजूरी नंतर स्थायी समितीमध्ये त्या निविदाची मान्यता घेतलेली आहे व अकोला प्रवासी वाहतूक संस्था या संस्थेस ती बससेवेची निविदा मिळालेली आहे. यातून महानगरपालिकेस ८० पैसे प्र.कि. मीटर रॉयल्टी महापालिकेस मिळणार असून याची मान्यता स्थायी समिती सभेने दिलेली आहे. त्यानूसार संबधीत संस्थेची महानगरपालिकेने करारनामा करून कार्यादेश दिलेले असून काल बसेस वर रंग कसा असावा यासाठी काही बसेस दाखल झालेल्या आहे. एकूण १९ मार्ग अंतिम केलेले आहे. यात आणखी दोन मार्ग महापालिकेने वाढविलेले आहे. एकूण ५० ते ३०० बस स्टॉप बांधण्यात येणार आहे. यासाठी १ ते दीड कोटीचा खर्च अपेक्षीत आहे. हे बसस्टॉप बांधण्या संदर्भात पदाधिकारी यांची मान्यता घेवून च कार्यवाही सुरू केलेली असून एका बाजूवर महानगरपालिकेस वापरण्यास मिळणार जेकी जहीरात वगैरे करता येईल. एक बाजू संबधीत एजन्सीज यांना मिळणार आहे. बसस्टॉपच्या बाजूला स्टॉल राहणार आहे.

मा.सभापती : २५० बसस्टॉप करीत असतांना किती कि.मीटरवर एक बसस्टॉप होणार आहे.

अति.शहर अभियंता : यात सिडको हडको भाग तसेच नक्षत्रवाडी. चिकलठाणा हा सूध्दा भाग येतो.

श्री.रेणुकादास वैद्य : ज्या ठिकाणी बसस्टॉप बांधणार आहेत त्या जगेवर कुणास मालकी हक्क आहेत काय. त्यावर अधिकार कुणाचा राहणार आहे.

अति.शहर अभियंता : महानगरपालिकेचीच मालमत्ता आहे.कुणाचा मालकी हक्क नाही.

श्री.कंवरसिंग बैनाडे : जेव्हा संस्थेशी करारनामा केला तेंव्हा त्यात अमुक भाग संस्थेनी वापरावा व अमूक भाग महानगरपालिकेने वापरावा असे नमूद केलेले होते का तसेच जेस्टॉल राहणार आहे त्याचे भाडे रक्कम कुणास मिळणार आहे.

मा.सभापती : जे कार्यवाही होत आहे. ते सर्व करारनाम्यामध्ये आहे का असे स. सदस्यांचे म्हणणे आहे.

अति.शहर अभियंता : करारनामा केलेला आहे. त्यात सर्व अटी शर्ती दिलेल्या आहेत.

श्री. कवरसिंग बैनाडे : करारनाम्याची एक प्रत आम्हा सर्व सदस्यांना देण्यात यावी.

मा.आयुक्त : स्थायी समिती सर्वसाधारण सभेने ज्या अटी शर्तींना मान्यता दिलेली आहे त्यांनूसार करारनामा केलेला आहे.जे काही बसथांबे बाधण्यात येणार आहे त्याचा मालकी हक्क महानगरपालिकेस मिळणार आहे. महानगरपालिकेस यामाध्यमातून रॉयल्टी मिळणार असून जर १०० बसेस सूरू झाल्या तर प्रत्येक दिवशी बसेस १३ हजर कि. मीटर धावणार आहे. त्यानूसार वर्षाभरामधे ४० ते ५० लक्ष रूपये रॉयल्टी मिळेल असे वाटते.जसजसे रूट वाढतील नागरीकांच्या डिमांड वाढतील तसेच डिझेलची दरवाढ झाल्यानंतर त्याप्रमाणे आरटी ओ यांनी दरवाढ मंजूर केली तर त्याप्रमाणे रॉयल्टी वाढेल.बसेसवरील दोन बाजूपैकी एक बाजू महानगरपालिकेस वापरण्यास मिळणार आहे. दूसरी बाजू ही संस्थेला मिळणार आहे. तसेच बसथांबा जे होणार आहे त्यातील एक बाजू महानगरपालिकेस जहीरातीसाठी वापरण्यास मिळणार आहे. महापालिका जहीरात देईल किंवा दुसऱ्याना देवून महापालिकेस महसूल मिळेल.अपंगांना देण्यासाठी महापालिकेचे धोरण होते. २० ते २२ अपंग असणाऱ्यांना असे देण्यास हरकत नाही त्याचा

व्यवसाय होईल. परंतू यावर चर्चा चालू असतांना बसस्टॉप डिझाईन संदर्भात जेंव्हा चर्चा चालू होती त्यावेळी असे त्यांना सांगण्यात आले की.महापालिका ठरवून देईल अशा स्टॉल तेथे असावा उदा. पाणी,तसेच महापालिका ठरवून देईल त्यांनाच देण्यात येईल.

श्री.गजनन बारवाल : सर्वच जगा अपंगांना देणार आहात का. जी जहीरात होणार आहे. अर्धी जगा महानगरपालिकेला व अर्धी जगा संबधीत एजन्सी वापरात आणार आहे.परंतू मागिल बाजूव समोरील बाजूचा उपयोग कोण करणार आहे.

मा.आयुक्त : संबधीतांनी बसस्टॉप बाधांवे . पाठीमागील साईडला काही नसते. तीन साईड मधील एक साईड महापालिकेस मिळणार आहे. दूकान मधे महापालिका ठरवून देईल त्याच व्यक्तीला दिले जईल. त्याचे जेरेन्ट आहे ते महापालिकेस मिळणार आहे. बाकीचा खर्च संबधीतांनी करावा. समोरचा भाग त्यांनी वापरावा.

मा.सभापती : करारनामा जे झालेला आहे त्याची प्रत सर्वांना वितरीत करण्यात यावी. अधिकारी/कर्मचारी यांना मोबाईल देण्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. या संदर्भात १० लक्षच्याच खर्चापर्यत मान्यता दिलेली आहे. त्यात जस्तीत जस्त ज्यांना ज्या अधिकारी कर्मचारी यांचेशी संपर्क साधावा लागतो त्यांनाच या सुविधा देण्या बाबत निर्णय घेतलेला आहे. व अशांचा समावेश करून १० लक्ष पर्यतंच खर्च होईल याची दक्षता घ्यावी अशी मान्यता दिलेली आहे. ज्यांना देणे आवश्यक होते त्यांना देण्यात आलेले नाही त्या बाबतीत खूलासा करावा.

श्री.कवरसिंग बैनाडे : जेंव्हा प्रस्ताव सभागृहात आला त्यावेळी क. अभियंता यांना सुध्दा ही सूविधा दयावी म्हणून मागणी केलेली होती.

शहर अभियता : या संदर्भात ३२ फोन देण्या बाबतचा डी.डी. पाठविण्यात आलेला होता. ३२ सिमकार्ड देण्या बाबत विनंतीही केलेली होती. सीमकार्ड नसल्यामूळे डी. डी. परत केला त्या संदर्भात पाठपूरावा केला असतां १५ सिमकार्ड दिलेले आहे. ते विभाग प्रमूख यांना देण्यात आलेले आहे. उर्वरीत आल्यानंतर जेवार्ड अधिकारी वार्ड अभियंता राहिलेले असतील त्यांना देण्यात येतील.

मा.सभापती : क. अभियंता यांना सिमकार्ड देणार आहात का याचा खुलासा करावा.

सौ. लता दलाल : सहा लक्ष खर्चाचा प्रस्तावा समोर आलेला होता. त्यावेळी चर्चा होवून क.अभियंता यांना सुध्दा ही सुविधा दयावी. त्यांचेशी जस्त प्रमाणात नगरसेवकांना काम पडते. त्यामूळे ६ लक्षचा खर्च १० लक्षपर्यत करण्यास मान्यता दिलेली होती. सर्व क. अभियंता यांना देण्यात यावे असे आदेशीत करावे.

श्री. गजनन बारवाल : महापौर बंगल्यावंर जेकर्मचारी जस्तीचे काम करतात त्यांना मोबदला दिला जत नाही. मा. आयुक्तांच्या बंगल्यावर जे कर्मचारी काम करतात त्यांना जस्तीच्या कामाचा मोबदला दिला जतो. ही तफावत कशासाठी.संबधीत कर्मचारी यांनी उपआयुक्त प्रशासन यांना विनंती अर्जदिलेला आहे. कार्यवाही का होत नाही.

उपआयुक्त(प्र) : महापौर बंगल्यावरील कर्मचारी यांनी तसे निवेदन माझ्याकडे दिलेले आहे. जेकी सार्वजनिक सुट्टयाचा मोबदला देण्या बाबत. जे शासकीय सुट्टीचा मोबदला देणे देय आहे. त्याची माहिती देण्यात येईल.

मा.सभापती : वरीष्ठ अधिकारी यांनी असे उत्तर देणे बरोबर नाही. किती विभागासाठी अशा प्रकारचा मोबदला दिला जतो. व किती विभागांना दिला जत नाही.

उपआयुक्त(प्रशासन) : दहा मिनिटात माहिती दिली जईल.

सौ. लता दलाल : मागिल काही दिवसापूर्वी मोठया प्रमाणात बदल्या मा. आयुक्तांनी केलेल्या आहे. अनेक दिवसापासून एकाच जगेवर कर्मचारी काम करीत होते. ही चर्चावृत्तपत्रांच्या माध्यमातून चांगलीच प्रसिध्द झालेली होती. परंतू बदल्या केलेल्या कर्मचारी हे पून्हा त्यांचेच विभागात किंवा इतर विभागात हळूहळू येण्यास सुरूवात झालेली आहे. अशा प्रकारच्या बदल्या होत आहेत का याची माहिती देण्यात यावी. जे कर्मचारी मजूर म्हणून कार्यरत आहे ते मजूर म्हणून झोन मधे काम करतात का? वार्ड कार्यालय-फ मध्ये एका दैनिक वेतनावरील कर्मचारी यांनी लाखो रूपयाचा अपहार केलेला आहे अशी माहिती मिळालेली आहे. त्या संदर्भात काय कार्यवाही केलेली आहे.तसेच ११२४ कर्मचारी भरती संदर्भातही माहिती दयावी. ही भरती विभागात कार्यरत असलेल्या जेष्ठतेनूसार केलेली असून जे राहिले त्यांना घेण्यात आलेले नाही. काहींना ३ ते ८ वर्ष झाले त्यांना घेतलेले आहे परंतू काही कर्मचारी त्याच यादीतील काही कर्मचारी हे १० वर्षापासून कार्यरत होते त्यांना घेण्यात आलेले नाही.असे जे कर्मचारी राहिलेले आहे त्याचंवर अन्याय झालेला आहे असे माझे मत आहे. काही कर्मचारी हे २४, ३०,४० वर्ष वयाचे असूनही कायमस्वरूपी सेवेत नाही. हा त्यांचेवर अन्याय असून अशा कर्मचाऱ्यानी प्रशासनाने नोंद घ्यावी. ज्या जगा रिक्त होत्या खुल्या संवर्गातील असतील मध्येच शुन्य बिंदू नामावली बदलली जे बदल झाला त्यामूळे काही कर्मचारी यांना सेवेत घेतले नाही. ही सर्व माहिती आजच्या सभेत देण्यात यावी.

श्री.मुजेब खान : ११२४ कर्मचारी भरती करतांना मोठा भ्रष्टाचार झालेला आहे यापूर्वी मी सभागृहात नमूद केलेले होते. मा.आयुक्त यांना या संदर्भात निवेदन ही दिलेले आहे. आज कार्यवाही करू म्हणून कालावधी निघून जत आहे. यात कोणते कर्मचारी बाहेरचे भरती केलेले आहे. या संदर्भात सविस्तर टिप्पणी करून दिलेले आहे. परंतू हे निदर्शनास येते की वारंवार तक्रार करूनही कार्यवाही होत नाही. चौकशी होत नाही जणूनबूजून त्याकडे दूर्लक्ष केले जत आहे. जे भ्रष्टाचार झालेला आहे त्याची चौकशी करण्यास मागे का टाकले जत आहे.

मा.आयुक्त : जकात संदर्भात व नोकर भरती संदर्भात स. सदस्य श्री. मुजेब खान यांना ५ तारखेला माझे दालनात बोलविले होते. परंतू उपस्थित झालेले नाही.

श्री.मुजेब खान : मी आयुक्तांच्या दालनात ५ तारखेला येवू गेलेले होतो. यादी दिलेली होती. या संदर्भात उच्च न्यायालयाचे आदेश असून त्या प्रमाणे भरती झालेली आहे की नाही याची चौकशी करण्याचे काम प्रशासनाचे आहे. १० ते १२ लोकांचे स्पेशल नाव दिलेले आहे. ते बाहेरचे भरती केलेले आहे. तसेच जकात पावती बुक संदर्भातही माहिती दिलेली आहे त्याचीही चौकशी होत नाही.यांचे कारण काय जवळपास ७० ते ८० लक्षचा भ्रष्टाचार आहे. खालचे कर्मचारी यांचेवर कार्यवाही होते परंतू अधिकारी यांचेवर कार्यवाही तात्काळ का होत नाही. तसेच जकात विभागातील जे जेष्ठ कर्मचारी आहे ते तेथे काम करीत आहे त्यांचे बदल्या अद्याप करण्यात आलेल्या नाहीत. एक दोन महिने इतर विभागात दिले जते पून्हा जकात विभागात त्यांचे नियुक्त्या केल्या जतात ही वस्तुस्थिती आहे. जकात भ्रष्टाचार संदर्भात शहरात मोठया प्रमाणात चर्चा होते. परंतू प्रशासन दखल घेत नाही.

श्री.कवरसिंग बैनाडे : जी नोकर भरती झाली त्यात काही कर्मचारी याचे वय १५ वर्षाचे असतांना समावेश करून घेतलेले आहे. हे सत्य आहे का याचाही खुलासा करावा.

श्री.मुजेब खान : ११२४ कर्मचारी भरती संदर्भात संपूर्ण नावासहीत चौकशी तात्काळ व्हावी. झालेला भ्रष्टाचार समोर येईल.

श्री.रेणूकादास वैद्य : १९९८ पासून आरोग्य विभागात कार्यरत असलेले दैनिक वेतनावरील कर्मचारी यांना कायम सेवेत घेतलेले नाही. तसेच जलतरण तलाव मधे श्री. रमेश शिंदे नावाचे कर्मचारी यांना सूध्दा १९९८ पासून आतापर्यत सेवेत कायम केलेले नाही. संबंधीत कर्मचारी सहकुटुंब येऊन रॉकेल टाकून जळून घेत होते. कारणे देवून टाळले जते.

श्री. गजनन बारवाल : आरोग्य विभागातील पदे व इतर काही पदाच्या भरती संदर्भात एक वर्षापूर्वी कार्यवाही सुरू झालेली होती. अदयाप ती का थांबलेली आहे आता पून्हा सूरू झालेली आहे उशीर का झालेला आहे याचाही खुलासा करावा.

मा.सभापती : अस्थापना विभागाच्या संदर्भात या सभेत चर्चा होणार आहे यांची कल्पना प्रशासनाला यापूर्वीच दिलेली होती.रिक्त पदे , पदोन्नती संदर्भात तसेच बदल्या संदर्भात जी प्रकरणे असतील त्याची संपूर्ण माहिती सभागृहात ठेवावी अशा सूचना दिलेल्या होत्या. व खुलासा करीत असतांना पूढील बैठकीत माहिती देण्यात येईल असा खूलासा अपेक्षीत नाही. अस्थापनेवर विभागामधे किती कर्मचारी वर्ग १,२ ३,४ संवर्गातील कार्यरत आहे.तसेच ११२४ जी नोकर भरती केलेली होती त्याची आजची परीस्थिती काय आहे. नोकर भरती करतांना सर्वांना सारखेच नियम असतात की वेगवेगळे नियम लावले जतात याचाही खूलासा होणे अपेक्षीत आहे.या संदर्भात अस्थापना विभागाचे अधिकारी यांनी सर्व प्रथम खुलासा करावा त्यानंतर उपआयुक्त प्रशासन खुलासा करतील.

श्री. दिलीप गायकवाड: या नोकर भरतीच्या संदर्भात आताच एक दैनिक वेतनावरील कर्मचारी श्री. शिंदे यांनी अस्थापना विभागा समोर आत्महत्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे.सभागृहाच्या बाहेर सदर कर्मचारी बसलेले आहे. त्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने सूचना देण्यात याव्यात.

श्री. गजनन बारवाल : संबधीत कर्मचारीयांना त्रास देण्याचा प्रयत्न होतो आहे. त्यावरही चर्चा करून योग्य तो निर्णय घ्यावा.

सहा. आयुक्त-१ : महानगरपालिकेच्या अस्थापनेवर वर्ग १ मधे एकूण १२ पदे मंजूर आहेत.वर्ग -२ मधे ६२ पदे मंजूर आहे.वर्ग -३ मधे १३५६ तर वर्ग -४ संवर्गात आरक्षीत ६०५ तर आरक्षीत नसलेले पदे २७५१ असे एकूण ४७८६ पदे मंजूर असून त्यापैकी ४५९९ पदावर कर्मचारी कार्यरत असून १८७ पदे रिक्त आहेत.

श्री.रेणुकादास वैद्य : रिक्त पदे किती आहेत याचाही खूलासा करावा. व कोणत्या सर्वगातील आहे.

सौ. लता दलाल : वर्ग - ३ संवर्गातील किती पदे रिक्त असून ती पदे कोणत्या संवर्गातील आहेत याचाही खूलासा करावा.

मा.सभापती : अतिरिक्त कार्यभार किती अधिकारी /कर्मचाऱ्याकडे आहे किती वर्षापासून आहे. कोणत्या सभागृहाची मान्यता घेतलेली होती. मुदत संपलेली आहे की नाही रिक्त पदे का भरण्यात आलेली नाही संपूर्ण खुलासा करावा.

सहा. आयुक्त-१ : विभागीय अधिकारी सवंर्गातील १२ पदे असून ७ पदे भरलेली आहे ५ पदे अदयाप भरलेली नाही.

मा.सभापती : किती वर्षापासून ही पदे रिक्त आहे. व अदयाप का भरलेली नाही सविस्तर खूलासा करावा.

सहा. आयुक्त-१ : विभागीय अधिकारी संवर्गातील पाच पदे रिक्त असून कार्यालयीन अधिक्षक सवंर्गातून पदोन्नतीने ही पदे भरावयाची आहे.परंतू कार्यालयीन अधिक्षक संवर्गात कमी पदावर कर्मचारी कार्यरत आहे तीन पदे रिक्त आहे. किमान कार्यालयीन अधिक्षक सवंर्गात ३ वर्ष काम केलेले असावे अशी अट आहे.

श्री. रेणुकादास वैद्य : कार्यालयीन अधिक्षकाची तीन पदे रिक्त आहे यांचा अर्थ विभागीय अधिकारी संवर्गातील पदेच भरती करणार नाही. कार्यालयीनअधिक्षक ही पदे का अगोदर भरती केली जत नाही.

सौ. लता दलाल : कार्यालयीन अधिक्षक पदावर तीन कर्मचारी आहे तीन पदे रिक्त आहे. जी तीन पदे भरली गेलेली आहे ती नियमानूसार भरती केलेली आहे काय सदर कर्मचारी हे कार्यालयीन अधिक्षक पदासाठी पात्र होतेज्या सवांर्गसाठी ती पदे होती त्या सवांर्गतील ते उमेदवार आहेत का याचाही खुलासा करावा?याचा अर्थ कार्यालयीन अधिक्षकाची ६ व विभागीय अधिकारी सवांर्गतील ५ पदे अशी एकूण ११ पदे रिक्त आहे असे स्पष्ट मत माझे आहे.चुकीची माहिती देत आहे.

मा. सभापती : जेंव्हा जी पदे रिक्त झालेली आहे ती भरण्या संदर्भात मा. आयुक्त उपआयुक्त यांचेकडे पाठपूरावा केलेला आहे याचाही खुलासा करावा. तारीखसह माहिती देण्यात यावी.विभागीय अधिकारी हे पद महत्वाचे असून त्या वार्डात वसूली कमी झाली तर त्यास जबाबदार कोण?शिवाय विकास कामावर परीणाम होवू शकतो याची जणीव प्रशासनास नाही का ?रिक्त पदे किती वर्ष ठेवू शकतो याचाही खूलासा करावा .

सहा. आयुक्त -१ : विभागीय अधिकारी संवर्गातील पद हे पदोन्नतीमधून भरता येणार नाही हा दृष्टीकोन समोर ठेवून मा. विभागीय आयुक्त यांना महापालिकेच्या अस्थापनेवर चार तहसीलदार प्रतिनियुक्तीने पाठविण्याची विनंती केलेली आहे. विभागीय आयुक्त यांना या संदर्भात पाच ते सहा पत्र दिलेले आहे. एक पत्र १५ दिवसापूर्वीच देण्यात आलेले आहे.

मा.सभापती : चार वर्षात चार पत्र देण्यात आलेले आहे. वर्षात एक पत्र दिले. हे योग्य नाही.तसेच ११२४ कर्मचारी भरती केलेले आहे ते नियमानूसार कार्यवाही झालेली आहे का याचाही खुलासा करावा.

सौ. लता दलाल : सभागृहाचा वेळ वाया जत आहे. पत्र दिल्यानंतरही प्रशासनाकडून उत्तर मिळत नसेल तर योग्य नाही.

श्री. गजनन बारवाल : नोकर भरती संदर्भात जहीरात देण्यात आलेली होती. ती कार्यवाही का थांबविलेली आहे याचाही खूलासा घेण्यात यावा.

सौ. गजनन बारवाल : सहा. आयुक्त या संवर्गात बसतात का याची शंका येत आहे. उत्तर बरोबर देत नाही. अगोदर सांगतात की चार पाच पत्र विभागीय आयुक्त यांना दिले नंतर दोन तीन दिले असे सांगतात. माझ्या माहितीनूसार एक पत्र दिलेले असेल. सभागृहाची दिशाभूल होत असेल तर सर्वसामान्य नागरीकांना किती त्रास होत असेल. संबधीत अधिकारी माहिती देण्यास सक्षम नसतील तर त्यांचेवर कार्यवाही करावी.

मा.सभापती : उपआयुक्त , प्रशासन यांनी खुलासा करावी.

उपआयुक्त(प्र) : ११२४ कर्मचाऱ्याना शासन निर्देशानूसार दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्याना कायम स्वरूपी सेवेचे आदेश दिलेले आहे. या पदाच्या बाबतीत सर्वसाधारण सभेची मान्यता होती. त्यानंतर शासनाकडे पाठविण्यात आलेले होते.शासनाची मंजूरी आल्यानंतर विभागवाईजजेष्ठता यादी तयार करण्यात आली. व जे कर्मचारी दैनिक वेतनावर कार्यरत होते त्यांचे नाव व प्रथम नियुक्तीची तारीख कोणत्या विभागात कार्यरत आहे जन्म तारीख, सध्याचे वय काय हे सर्व विचारात घेवून या संबधीचा निवड समितीचा मा. आयुक्त, त्यावेळचे मुख्य लेखा परीक्षक, उपआयुक्त (प्र),उप आयुक्त(म), यांचे कमेटीने अहवाल दिलेला होता .तो मा.सभापती यांचेकडे देण्यात येत आहे. यादीच्या व्यतिरिक्त एकही बाहेरील कर्मचारी घेण्यात आलेले नाही. आरक्षीत पदाच्यासंदर्भात यांत्रिकी विभागातील ४ पदे तसेच आरोग्य विभागातील १२ पदे अशा प्रकारे १८ पदाचा अनुशेष यापैकी शिल्लक आहे.सेवा जेष्ठता यादीनूसार भरती केलेली आहे.

श्री.मुजीब खान : सभागृहाची दिशाभूल केली जत आहे. जेजेष्ठता यादीत येत नव्हते त्यांना घेतलेले आहे.१९८८ पासून सेवेत असलेले कर्मचारी कायम केलेले नाही. सन ९२-९३ पासून सेवेत असलेले किती लोक बाकी आहे. यात सन२००० पासून जे होते त्यांना घेण्यात आलेले आहे.सर्व भ्रष्टाचार करून भरती केलेले आहे. मी निवेदन दिले सर्व टिकमार्क करून दिलेले आहे त्याची चौकशी का होत नाही. न्यायालयाचे आदेश काय होते त्यानूसार भरती केलेले दिसून येत नाही.

श्री. नासेर नहदी : स.सदस्य श्री.मुजीब खान यांनी यादीसह टिकमार्क करून दिलेले आहे जे की बाहेरचे कोणकोणते कर्मचारी घेतलेले आहे. वारंवार या सभागृहात चर्चा होते कार्यवाही होत नाही.

उपआयुक्त (प्रशासन) : ही नोकरी भरती करतांना शासनाने ज्या अटी शर्ती घालून दिलेल्या होत्या. त्यानूसार कार्यवाही केलेली आहे. औरंगाबाद महानगरपालिकेने प्रस्तावित केलेल्या विविध संवर्गातील ११२४ पदाच्या निर्मितीला व त्या पदावरील महानगरपालिकेतील रोजंदारी कर्मचाऱ्याना सेवा जेष्ठता यादीनूसार सेवेत कायम स्वरूपी करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे ५१(४)४ अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून शासन या द्वारे खालील अटीचा अधीन राहून मंजूरी देत आहे. औरंगाबाद महानगरपालिकेने यापूढे शासनाच्या मान्यतेशिवाय दैनिक वेतनावर ठराविक वेतनावर व अन्य प्रकारे कर्मचारी नियुक्त करू नये. ११२४ पदावर जे महापालिका सेवेत अनेक वर्षापासून रोजंदारीवर काम करीत असलेल्या कर्मचाऱ्याना सेवाजेष्ठतेनूसार या शासन निर्णयाच्या दिनांकापासून कायम स्वरूपी समाविष्ट करण्यात यावे व यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेने मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबादच्या आदेशाप्रमाणे तयार केलेल्या जेष्ठता यादी व या व्यतिरिक्त महापालिकेने तयार केलेली जेष्ठता यादी याद्वारे सदर पदे भरावी. रोजंदारी कर्मचाऱ्याना सेवेत नियमित करतांना जे सध्या महापालिकेत दैनिक वेतनावर कार्यरत आहे त्यांचाच विचार करण्यात यावा. व कामगाराचे कमाल वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता पूर्ण नसल्यास त्यास शिथीलता देण्यात यावी. सेवा जेष्ठता पदासाठी आवशक केलेली अर्हता व शासनाने वेळोवेळी आरक्षणाच्या बाबतीत केलेल्या सूचनाची पालन करावे.

मा.सभापती : शासनाचे हे आदेश आहे त्याप्रमाणे सध्या नोकर भरती होते का ?किती जगा रिक्त आहे व का भरलेल्या नाहीत.

श्री. रेणूकादास वैद्य :१९८८ पासून आरोग्य विभागात कर्मचारी सेवेत आहे त्यांचा यामधे समावेश का झालेला नाही.

सौ. लता दलाल :यात सन ८६,८७,८८ मधील कर्मचारी आहे. १९८८ ला एक ठराव पास करून कामाचा व्याप लक्षात घेता दैनिक वेतनावर कर्मचारी घ्यावे असे निर्णय झाला होता. मा. भोगे साहेब आयुक्त होते. काही लोक कोर्टात गेलेले होते. त्यांचेवर अन्याय होत होता. म्हणून न्यायालयाने असे निर्देश दिले की १९९५ पर्यत जेजे कर्मचारी घेतलेले आहे त्याची यादी तयार करावी. सन १९९५ नंतर काही कर्मचारी सेवेत घेतले त्याची नावे या ११२४ च्याभरती मधे आलेली आहे. परंतू सन ८५,८६,८७ मधील काही लोकांना घेतलेले नाही. त्याचे वय आज४० वर्ष असून त्यांना घेतलेले नाही. सन २००० मधे सेवेत घेतेलेले यांचा यात समावेश करण्यात आलेला आहे. नाव घेतल्यास अनेक अधिकारी व कामगार नेत्याची भांडेफोड येथे होईल.ज्याचा या महानगरपालिकेशी संबध नाही त्यांना सेवेत समावेश केलेले आहे त्याची नावे प्रशासनास देवू शकते इतपर्यत माहिती माझ्याकडे आहे.

श्री.मुजीब खान : जेजेकर्मचारी दैनिक वेतनावर आहे व या नोकर भरतीतून राहिलेले आहे. त्यांना घेण्यात यावे. यांत्रिकी विभागात आज्ही काही कर्मचारी दैनिक वेतनावर काम करीत आहे.

सौ. लता दलाल : जेसीबी मशीन साठी किती वाहन चालक आहे. रोड रोलर साठी किती आहे ते कायम स्वरूपी आहेत का किती पदांना मंजूरी असतांना भरती केलेले नाही.

उपआयुक्त(प्रशासन) : ११२४ पदापैकी काही पदे भरावयाची राहिलेली आहे.जी पदे भरलेली नाही त्यासाठी विशिष्ट शैक्षणिक अर्हता आहे.

मा.सभापती : उपआयुक्त , प्रशासन यांनी नोकर भरती संदर्भात योग्य ती माहिती दिलेली नाही. त्यांचे कडे माहिती नाही. या विषयावर दूपारी ३.०० वाजता चर्चा करण्यात येईल. त्यावेळी सर्व माहिती संबधीत अधिकारी यांनी सोबत घेवून यावी.

श्री.शंशाक विसपूते : गुंठेवारी भागात काम चांगल्या प्रकारे चालू आहे.त्याभागात जगा शिल्लक नाही. परंतू ज्या ठिकाणी नाला आहे. नॅचरल स्लोप आहे अशा ठिकाणी प्लॉटींग केली जते.सन २००१ नंतर ही अनेक ठिकाणी प्लॉटींग होवून रस्ते बंद होण्याची शक्यता आहे. प्रशासनाने दखल घ्यावी परत प्लॉटींग होणार नाही. याची दखल घ्यावी.

सौ.लता दलाल : गारखेडा भुखंड संदर्भात समिती नियुक्त केलेली होती किंवा त्या संबधीचा अहवाल अदयाप आलेला नाही. मा. सभापती यांचे कडे अहवाल आलेला असेल तर तसे या सभागृहाला निर्देशीत करावे.

मा.सभापती : गारखेडा सर्वे नंबर ५३,५७ च्या बाबतीत या सभागृहाने एक निर्णय घेतलेला होता की, त्या संदर्भात मुख्यलेखा परीक्षक यानी त्या जमिनीचा जे मोबदला देण्यात आलेला आहे आणि एफएसआय देण्यात आलेला आहे त्या संदर्भात ज्या काही कार्यवाही करण्यात आलेल्या आहे त्या कार्यवाहीच्या बाबतीत ज्या काही चूका झालेल्या आहे. कमतरता राहिलेल्या आहेत. नियमात काही असतांना दुसऱ्या नियमाचा काही वापर झालेला आहे काय त्याची संपूर्ण चौकशी करण्याच्या

संदर्भात या सभागृहाने निर्णय घेतलेला होता. त्यानुसार मुख्य लेखा परीक्षक यांनी त्याचा जे काही गोपनीय अहवाल आहे तो माझ्याकडे सुपूर्द केलेला आहे. सर्वांच्या साक्षीने तो अहवाल परवानगी असेल तर उघडण्यात येत आहे. (याच वेळी सर्व स. सदस्य अहवाल उघडण्यास मान्यता देतात.) व तद्नंतर या अहवालाच्या प्रती सर्व सदस्यांना देण्यात याव्यात तसेच प्रेसला सुध्दा देण्या संदर्भात सूचना करीत आहे. त्याच प्रमाणे आठ दिवसानंतर होणाऱ्या स्थायी समितीच्या बैठकीत या अहवालावर सविस्तर चर्चा होईल. चर्चा झाल्यानंतर पून्हा त्या संबधी काय कार्यवाही करावयाची हे सभागृहाचे एकमत झाल्यानंतर निर्णय घेण्यात येईल. वझालेल्या निर्णयानूसार कार्यवाही करण्याच्या संदर्भात अमलबजवणी करण्यास प्रशासन बांधील राहील स.सदस्य श्री. गवळी यांनी गारखेडा येथील जनकपूरी येथील जगेच्या संदर्भात मागिल बैठकीत जे मुद्दा उपस्थित केलला होता त्या संदर्भात सहा. संचालक यांनी स.सदस्य श्री. गवळी यांना त्या संबधी माहिती दयावी. अशी सूचना करण्यात येत आहे.(गारखेडा भूखंड प्रकरणाचा चौकशी अहवाल प्रत जेडली आहे.)

श्री. मुजेब खान : मागिल एका बैठकीत मोतीवाला हॉलच्या संदर्भात चार दिवसात माहिती देणार होते अद्याप दिलेली नाही. त्या ठिकाणी अनधिकृत बांधकाम होत आहे.

सहा. संचालक (न.र.): गारखेडा सर्वे नं. ६० मधील रेखांकनातील भूखंड बाबत झालेल्या आदलाबदला बाबत गारखेडा भागातील जनकपूरी, वेलकम नगर, आदित्यनगर या भागासाठी ९ मीटर रूंदीचा रस्ता उपलब्ध व्हावा म्हणून उक्त रेखांकनातील भूखंड क्र.९ मधील जगा महानगरपालिकेने घेतलेली असून घेण्यात आलेल्या जगेच्या बदल्यात आदलाबदल प्रस्तावा अंतर्गत स्थायी समितीचा ठराव क्र १२७ दि.३०.७.९८ नूसार व दस्तऐवजक्र.३०१ दि.२२.१.९९ याच रेखाकंनातील खुल्या जगेतून जगा भूंखड म्हणून भूखंडधारक श्री.दिनकर पेशकर यांना बांधकाम परवानगी संचिका क्र ३०४/१७/९७ परवाना क्र ८६३ दिनांक २६.३.१९९९ ला देण्यात आलेली होती. वर उल्लेख केल्यानूसार सत्य परीस्थिती असली तरी रेखांकनातील खूल्या जगेचा विकास ९२-९३साली करण्यात आला. तथापी खुल्या जगेस कुपंन भिंत बांधतांना ती चूकीने भूखंड क्र १४ व भागश: खुल्या जगेवर बांधण्यात आल्याचे दिसून येते.

श्री.मुजेब खान : चूकीने बांधकाम केले ते प्रशासनाने केले की समोरच्या व्यक्तिने केले.

सहा. संचालक(न.र.) : महानगरपालिकेने काम केलेले आहे. दरम्यानच्या कालावधीत भूखंड क्र ९ चे मिळकत धारक यांनी कार्यालयाकडे त्याचे भूखंडाचे बदली मिळालेल्या खूल्या जगेवर बांधकाम करण्यासाठी परवानगी मागीतली होती. त्यानूसार परवाना क्र ८६३ नूसार दिनांक २६.३.९९ ला बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. हे सर्व होत असतांना भूखंड क्र १४ चे मालक श्री. रमेश नाईक यांनी सदरील इमारत त्याचे भूखंड वर बाधण्यात येत असल्या बाबत महापालिकेने सन ९२-९३ साली कूंपण भिंत बांधली त्यावेळी कुठलाही अक्षेप घेतला नाही. वस्तूत: कूंपन भिंत बाधतेवेळी त्यांनी अक्षेप घेणे आवशक होते तसेच रमेश नाईक बांधकाम करीत असतांना अक्षेप या कार्यालयास नोंद करणे अपेक्षीत होते. असे असतांना त्यांनी सदर इमारतीचे बांधकाम संबधाने म्हणजेदिनांक २१.३.२००० लेखी अक्षेप घेतला तो अक्षेप विचार घेवून त्यंना देणयात आलेली बांधकाम

परवानगी दिं. २१.७.२००० रोजी स्थगित करण्यात आली. वरील प्रमाणे वस्तूस्थिती असली तरी लगत वसाहतीसाठी रस्त्याची जगेसाठी आवशक असलेले क्षेत्र ५८१.९३चौ. मी. क्षेत्राच्या बदली त्यांना तेवढेच क्षेत्र बदली देण्यात आले. यात कार्यालयाने हेतूपूरस्सर अनियमतीता केलेली नसून बदली साठी अधिक क्षेत्राची जगा प्रदान करण्यात आलेली नाही. म्हणून वस्तूस्थिती लक्षात घेवून या कायालयाने प्राप्त आक्षेप विचारात घेवून बांधकाम परवानगीस स्थगिती दिलेली आहे. अदलाबदल प्रस्तावा प्रमाणे ९ मीटर रूंद रस्याची जगा ताब्यात घेण्यासंबंधी दि.३.४.९९ ला मालमत्ता विभागाला कळविले आहे.

श्री. रविकांत गवळी : सर्वे नं. ६० मधे किती प्लॉट आहे. मूळ संचिका कोठे आहे त्या लेआऊटला जगा देणे बंधनकारक आहे का श्री. देशकर यांना ओपन जगेतून प्लॉट दिला की प्लॉट दिला याचाही खूलासा करावा.

श्री.रेणूकादास वैद्य : या प्रकरणाची सखोल चौकशी करावी. चौकशी समिती गठीत करावी. त्याचा अहवाल मागवावा.

श्री.गजनन बारवाल : या समितीमधे सीटी सर्वेचे अधिकारी असावेत.

मा.सभापती :या सदर्भात तीन लोकांची समीती नियुक्त करण्यात येत आहे. समितीचे प्रमूख मुख्यलेखाधिकारी हे राहतील १५ दिवसात अहवाल सादर करावा.या प्रकरणाच्या संबधी जे काही कारदपत्र लागतील ते संबधीत अधिकारी यांनी चौकशी समितीकडे दयावे. मोतीवाला हॉलच्या संदर्भात उपआयूक्त महसूल यांनी या सभागृहात माहिती द्यावी.

श्री.मुजेब खान : सदर मालमत्तेचा कर किती आहे. किती कर भरलेला आहे व कमर्शियल आहे काय की नाही हे क्लीअेर करावयास पाहिजेहोते. त्या समोर तीन इमारती झालेल्या असून त्या इमारतींना कर आकारण्यात आलेला आहे काय?नळ कनेक्शन कट करण्यात आले होते. पून्हा त्या ठिकाणी नळ कनेक्शन दिलेले आहे काय याचाही खूलासा करावा.

उपआयुक्त(महसूल) : मोतीवाला फंक्शन हॉलच्या समोरील जी खूली जगा आहे किंवा काय व तेथील अतिक्रमण काढण्यासंबधी काय कार्यवाही केलेली आहे. असा प्रशन स. सदस्यांनी केलेला होता. या संबधी सहा. संचालक नगररचना यांचेकडे श्री. मोतीवाला यांनी या जगेच्या संदर्भात क्षेत्र दुरूस्ती संबधी अर्ज सादर केला होता. सहा. संचालक नगररचना यांनी दिनांक १८ ऑक्टोबर २००५ व २२.११.२००५ रोजे नगर भूमापन कार्यालयात दोन पत्र देवून संबधी क्षेत्र संबधी दुरूस्तीची कार्यवाही करावी अशी विनंती केलेली आहे. ही कार्यवाही होत नाही तोपर्यत अतिक्रमण असलेले काढता येत नाही. क्षेत्र दुरूस्ती झाल्यावर तात्काळ काढण्यात येईल. दि.२९.११.०५ रोजी सहा.संचालक नगर रचना यांनी स.सदस्यांना पत्र दिलेले आहे. मोतीवाला हॉल कडे नळ कनेक्शन आहे किंवा कसे असा दुसरा प्रश्न होता. या संबधी दिनांक १३.१२.२००५ रोजे कार्य. अभियंता यांचेकडे पत्र प्राप्त झाले. मोतीवाला फंक्शन हॉल या नांवाने नळ कनेक्शन नाही. या हॉलचा मालमत्ता कर ६ लक्ष थकबाकी होता. संबधीतांनी वार्ड कार्यालय क कडे कराच्या संदर्भात काही वाद निर्माण केलेला होता. सदर वादाची सुनावणी चालू आहे. संबधीतांनी २.५० लक्षचा धनादेश महापालिकेत दोन महिण्यापूर्वी दिलेला आहे. तो धनादेश वटलेला आहे.

श्री.मुजीब खान : खुल्या जगेवर तिसऱ्याच व्यक्तीचे नावाने मालमत्ता आहे. जवळपास ३० हजर स्क्वेअर फुट जगा समोरच्या व्यक्तीने समाविष्ठ करून घेतलेली आहे. आताच सांगण्यात आले की नळ कनेक्शन नाही तर त्या हॉलसाठी पाणी कोठून घेतले जते. २० वर्षापासून मोतीवाला फंक्शन हॉल चालू आहे. नळाचे पाणी अनधिकृतरित्या घेत आहे. समोर भागात तीन इमारती झालेल्या आहे त्याची बांधकाम परवानगी घेतलेली आहे काय याचाही खूलासा करावा. तीन तीन वेळेस लेआऊट रिवाईज केला जतो . २५ ते ३० फुटाचा रस्ता आहे रस्त्यावर पूर्णपणे अतिक्रमण झालेले आहे. बाजूच्या वसाहतीस जण्यास रस्ता राहिलेला नाही.असे असतांना कार्यवाही होत नाही. मोठया व्यक्तीवर कार्यवाही होत नाही असा अर्थ होतो. प्रशासनावर दबाव येत आहे असे वाटते अशी माझी शंका आहे.

मा.सभापती : या संबधी मा. आयुक्त यांनी दिं. १२.१.२००६ रोजे दालनामधे दुपारी १२.३० वाजता स. सदस्य यांना चौकशी व माहिती घेण्याच्या संदर्भात बोलविण्यात यावे.जेकाही स. सदस्य श्री. मुजीब खान यांचे हरकतीचे मुद्दे आहे ते सोडविण्यात यावे.

श्री. नासेर नहदी : निर्मल असोसिएटच्या संदर्भात काय कार्यवाही केली आहे.

मा.आयुक्त :या संदर्भात हेअरींग झालेली आहे लिगली महानगरपालिका हे बांधकाम थांबवू शकत नाही. वक्फ बोर्डला मी तसे सूचना दिलेल्या आहे की वक्फबोर्डाने दुरूस्ती करून घ्यावी. सध्याच्या मालकाविरूध्द स्टे आणावा. वकीलासोबत चर्चा केली आहे.

सौ. लता दलाल : शहरात अनेक ठिकाणी अनधिकृत नळ कनेक्शन असून स्टॅण्ड पोस्ट या नावाखाली अनेकांना नळ कनेक्शन दिलेली आहे. निदर्शनास आणून दिल्यानंतरही कार्यवाही केली जत नाही. जेथे गरज नाही ते नळ कनेक्शन कट केले जत नाही व त्यावेळी असे सांगितले जते की पोलीस संरक्षण नाही म्हणून कार्यवाही होत नाही.

श्री.मुजीब खान : नेहरूनगर येथे टाकण्यात आलेल्या पाईप लाईनच्या संदर्भात काय कार्यवाही केलेली आहे . त्यासाठी १.१० कोटी खर्च झालेला असून त्या भागात पाण्याची मोठया प्रमाणात टंचाई आहे. वारंवार पाण्याची मागणी करूनही कार्यवाही होत नाही.

श्री. रेणूकादास वैद्य :मागिल बैठकीत पाणी पूरवठा ६७ कोटीच्या योजनेच्या संदर्भात झालेल्या खर्चा संबधीची चौकशी समिती नियूक्त करण्याचे निर्देश दिलेले होते चौकशी समिती केलेली नसेल तर करण्यात यावी..

मा.सभापती : विषय मोठा आहे. माहिती घेणे गरजेचे असल्यामूळे जे काही तज्ञ अधिकारी आहे त्यांचे चर्चा करण्यासाठी प्रशासनास सूचना केलेल्या आहे. सदर तज्ञ व्यक्तीनी चौकशी मधे येण्याचे मान्य केल्यास तीन सदस्यी समिती पूढील तीन चार दिवसात नियुक्त केली जईल.तसेच अनधिकृत नळ कनेक्शन जेथे असतील त्या संबधी तसेच स्टॅण्ड पोस्ट जेथे नळ कनेक्शन दिलेले आहे परंतू तेथे पाणी वाया जते याची सुध्दा दखल संबधीत अधिकारी यांनी घ्यावी. स. सदस्य श्री. मुजीब खान यांनी विचारलेल्या प्रश्नाचा खूलासा कार्य. अभियंता पाणीपूरवठा उपस्थित नसल्यामूळे अति. शहर अभियंता यांनी खूलासा करावा.

अति.शहर अभियंता : नेहरूनगर येथील उंच टाकी भरण्या करीता ५०० मि.मि.डायमिटरची एमएस पाईपलाईन जिन्सीचा जे बाहेरचा संप आहे त्या पासून नेहरूनगर पर्यंत टाकण्यात आलेली आहे. सदरचे काम महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांनी केलेले आहे. अशा पाच ते सहा टाक्या बाधंण्यात आलेल्या होत्या. नेहरूनगर येथील टाकीचा त्यात समावेश होता. जिन्सीला जे पाणी पूरवठा होत होता तो १४०० मी.मी.व्यासाचे जलवाहिनीवरून होत असे. त्या वाढीव पाईप लाईन द्वारे या भागासही पाणी पूरवठा होणार होता. टाकीचे बांधकाम झाल्यानंतर टेस्टींग घेण्यात आलेली होती.परंतू दरम्यानच्या काळात १४०० व ७०० चे दोन्ही पाईपलाईनवरून पाणी पूरवठा कमी पडू लागल्याने नेहरूनगर येथील पाण्याची टाकी हर्सूल येथून दिल्लीगेट च्या टाकीवरून पंपीगने भरण्यास सुरूवात केली.सध्या ही पाईपलाईन द्वारे पाणीपूरवठा बंद आहे. या पाईपलाईनचा भविष्यात उपयोग होईल.

श्री.मुजेब खान : आजपर्यत जिन्सी भागाकडून येणाऱ्या पाईपलाईने टाकी भरलेली नाही. चूकीची माहिती देत आहे.तांत्रिक बाबीचा विचार न करता काम केलेले आहे. प्रशासनाची चूकी झालेली आहे. अधिकारी योग्य तो खुलासा करीत नाही.

मा.सभापती : सदर जलवाहिनीच्या संदर्भात जेकाही तांत्रिक दृष्टया काम करणे आवशक आहे ते कार्यकारी अभियंता पाणीपूरवठा यांनी त्या भागातील नागरीकांना पाणी मिळेल अशी कार्यवाही करावी. जे खर्च लागेल त्या खर्चास हे सभागृह मंजूरी देईल. या संदर्भात शहर अभियंता यांनी प्रत्यक्ष पाहणी करावी स. सदस्य श्री. मुजेब खान यांना विश्वासात घेवून पाहणी करावी. त्या संबधीची मलाही माहिती दयावी. तंत्रज्ञान पुढे गेलेले आहे. त्यामुळे झालेले काम वाया जणार नाही.

**<u>विषय क्र.१६४ :</u>**

कार्यकारी अभियंता(जलनि:सारण, विद्युत, इमारती व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हॉटेल अमरप्रीत ते बीड बायपास रोडवरील जलनि:सारण वाहिनी स्थलांतरीत करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.१०,८६,०००/- चे तयार करण्यात आले असून, त्यास मा.आयुक्त यांनी दि.१.७.२००५ रोजी मान्यता दिली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जहिरात देऊन निविदा मागविली असता, निविदा विक्रीच्या अंतिम तारखेला ३५ निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम दिवशी एकूण आठ निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.एल.के.कन्स्ट्रक्शन | २२.७८६% कमी दराने |
| २. | एस.एम.इब्राहीम | २२.७८६% कमी दराने |
| ३. | अमन असोसिएटस | २२% कमी दराने |
| ४. | सय्यद सुजत अली हाशमी | १९.९०% कमी दराने |
| ५. | अर्च अन्स्ट्रक्शन | १८.२०% कमी दराने |
| ६. | सुहास देशपांडे | १७.९९% कमी दराने |
| ७. | अजित सिंग | १७.५०% कमी दराने |
| ८. | रमेश तुळशीबागवाले | निविदा उघडली नाही. |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच २२.७८६% कमी दराची मे.एल.के.कन्स्ट्रक्शन व एस.एम.इब्राहीम या दोन गुत्तेदारांची निविदा सारख्याच दराची असल्यामुळे सदरील दोन्ही गुत्तेदारास मा.आयुक्त यांनी वाटाघाटीसाठी बोलविले असता, गुत्तेदार मे.एल.के.कन्स्ट्रक्शन दर कमी करण्यास तयार नाहीत. तथापी दुसरे गुत्तेदार मे.एस.एम.इब्राहीम हे काम २३% कमी दराने करण्यास तयार आहे.

त्यामुळे मे.एस.एम.इब्राहीम यांची अं.प.दरापेक्षा २३% कमी दराची निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. कवरसिंग बैनाडे :२३ टक्के बिलोने निविदा जत असून यात जवळपास संबधीत व्यक्ती अडीच लक्ष रूपये कमी करून काम करून देत आहे. परंतू होणारे काम हे चांगल्या प्रतिचे होईल का?

श्री. रेणूकादास वैद्य : कामाची प्रत चांगली असत नाही म्हणून पून्हा देखभाल दूरूस्तीची कामे त्या ठिकाणी करावे लागते. २२ ते २३ टक्के बिलोमधे टेंडर येत असेल तर अशी कामे स्विकारू नये अशी विनंती आहे. अल्प मुदतीची निविदा काढून कार्यवाही करावी

मा. आयुक्त : यात संबधीत ठैकेदार यांचेकडून पाच टक्के प्रमाणे एक्स्ट्रा गॅरंटी घेतली जते.

श्री. कवरसिंग बैनाडे : किती इंची पाईप टाकणार आहे सिमेटचे टाकणार आहे काय याचा उल्लेख दिसून येत नाही.

सौ. लता दलाल : जस्त बिलोमधे टेंडर येते व अशी कामे मध्यतंरीच बंद पडतात असा प्रकार होवू नये. कोकणवाडी रेल्वेस्टेशन रस्ता अशा प्रकारे बंद पडलेलाआहे. जस्त बिलोने कामे करून घ्यायची असेल तर संबधीत अधिकारी यांचेवर जबाबदारी टाकण्यात यावी. चांगल्या प्रतिचे काम होईल याची दखल संबधीत अधिकाऱ्यानी घ्यावी.

मा.सभापती : आठ क्रमाकांची निविदा का उघडण्यात आलेली नाही तसेच संपूर्ण निविदा आलेल्या नाहीत.अंदाजपत्रक सादर करतांना कोणते पाईप वापरण्यात येणार आहे कामाची कॉलीटी त्याची लेन्थ तसेच किती व्यासाचा पाईप वापरण्यात येणार आहे या तीन बाबीचा खुलासा प्रस्तावात असणे आवश्क आहे.ज्या सूचना केलेल्या आहे त्याची दखल अधिकारी यांनी ध्यावी.काम चांगल्या प्रकारे होण्याच्या दृष्टीनेच प्रशासनाचे प्रयत्न असावेत.हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.चांगले काम झाले नाही तर संबधी एजन्सीवर कार्यवाही करावी व कार्यवाही अधिकारी यांनी केली नाही तर अधिकाऱ्यावर कार्यवाही केली जईल यांची नोंद घ्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॉटेल अमरप्रीत ते बीड बायपास रोडवरील जलनि:सारण वाहिनी स्थलांतरीत करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम मे.एस.एम.इब्राहीम यांचेकडून अं.प.दरापेक्षा २३% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१६५ :**

उप आयुक्त (प्र) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेत नव्यानेच पर्यटन कक्षाची स्थापना करण्यात येवून पर्यटन कक्षासाठी डॉ.ज्ञानदा कुलकर्णी, सांस्कृतिक अधिकारी यांची कार्यालयीन आदेश क्र.मनपा/मआ/स्वीस/२००५/२९० दि.१५.७.२००५ अन्वये ''पर्यटन अधिकारी'' म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

पर्यटन कक्षात महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पर्यटन व पुरातन स्थळांची माहिती संकलीत करणे व पर्यटकांना ती उपलब्ध करून देणे ही कामे पार पाडावी लागतात. सदरील कामासाठी वळोवेळी कार्यालयांना, स्थळांना, तज्ज्ञांना भेटी देणे व प्राप्त माहितीचे संकलन करणे, विविध पर्यटन स्थळांची पाहणी करणे इ.कामांसाठी बाहेर जवे लागते. सांस्कृतिक अधिकारी या पदाच्या कार्यभारासाठीही वेळोवेळी कार्यक्रमांचे आयोजन व कार्यालयाबाहेर बैठकीस, कार्यक्रमांना उपस्थित राहावे लागते.

त्यासाठी डॉ.ज्ञानदा कुलकर्णी यांना रू.८००/- वाहन भत्ता मान्य करण्याबाबत प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. गजनन बारवाल : पर्यटकांच्या दृष्टीकोनातून जस्तीत जस्त कसे आकर्षीत करता येईल त्यासाठी प्रयत्न करावे. आणखी काही सूधारणा करता येईल ते पहावे. तसेच शिवाजे महाराज पूराण वस्तूसंग्रहालय मधे एक क्वॉईन म्यूझियम ठेवावे असा निर्णय घेतलेला होता. त्यासाठी अनेकदा श्री. रूणवाल यांनी प्रयत्न केलेले आहे.

सौ. लता दलाल : वाहन भत्ता देण्याचा विषय आहे. मागे सूध्दा अभियंता यांना वाहन भत्त हा ८०० रूपये दिला जतो तो २००० रूपये देण्यात यावा यासाठी प्रशासनाने वेळ मागवून घेतलेली होती. किंवा भत्ता न देता एखादा पेट्रोल पंपाचे पेट्रोलसाठी कुपन असेल तर ते देण्यात यावे. या प्रस्तावाच्या अनुशंगाने विचार करण्यात यावा.शिवाजे महाराज पूराण वस्तूसंग्रहालयातील जगा ही अपूरी पडते तीचा विस्तार करण्यात यावा.पार्कीगसाठी जगा नाही. तेथील स्वरूप चांगले करावे.

मा.सभापती : विषय क्र १६५ मंजूर करण्यात येत आहे हे शहर पर्यटनाचे शहर आहे व जेतीन म्यूझियम तयार केलेले आहे. मोठा खर्च यावर झालेला आहे. अबुल कलाम आझाद संशोधन केद्रांची इमारत गेल्या दोन वर्षापासून तयार झालेली आहे. पून्हा त्या इमारतीला रंग देण्याची वेळ येवू नये. त्या वास्तूचे लवकरात लवकर उद्घाटन करून कार्यवाही करावी सर्वासाठी खूले करण्यात यावे. तेथील ज्या सुविधा करावयाच्या बाकी असतील त्या तात्काळ कराव्यात. मा. महापौर यांचे परवानगीने सदर इमारतचे उद्घाटन करण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सौ.ज्ञानदा कुलकर्णी, सांस्कृतिक अधिकारी तथा पर्यटन अधिकारी, मनपा औरंगाबाद यांना प्रतिमहा रू.८००/- वाहन भत्ता देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

मा.सभापती : **ऐनवेळचे जे विषय आहे त्यास मान्यता देण्यात येते**. मागिल बैठकीत **दोन विषय स्थगित केलेले होते त्यास मान्यता देण्यात येते.**

श्री. विनायक पांडे : फुटपाथ तयार करतांना अगोदर रस्त्यावरील अतिक्रमण काढावे लागतील. महानगरपालिकेची जगा सुध्दा ताब्यात घेतलेली नाही. दुभाजकावर कपडे वाळायला टाकतात.

मा.सभापती : स. सदस्यांची सूचना लक्षात घेवून कार्यवाही करावी.

मा.आयुक्त : ज्या रस्त्याने पर्यटक जतात त्या सर्व रस्त्याचे एक एक अंदाजपत्रक मंजूरीसाठी येणार आहे. अतिक्रमण काढल्यानंतर कार्यवाही करणार आहोत. टेंडर मंजूर झाल्यानंतर अतिक्रमण काढण्याची कार्यवाही होईल.

श्री.मुजेब खान : जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जणाऱ्या रस्त्यावर ग्रिलवर कपडे टाकले जतात. बरोबर वाटत नाही.त्या संबधी कार्यवाही व्हावी.

श्री.रेणूकादास वैद्य : याच प्रमाणे छत्रपती शिवाजे महाराज यांचे पूतळयाच्या आजूबाजूला सूध्दा अनेक पोस्टर लावले जतात. या संबधी कार्यवाही झाली पाहिजे

श्री.शंशाक विसपूते : गजनन महाराजमंदीर जवळील चौकातही हाच प्रकार दिसून येईल.

श्री.मुजीब खान : अशा प्रकारे कूणी अनधिकृतरित्या पोस्टर लावत असेल तर दंड आकारणी केली पाहिजे कायदेशीर कार्यवाही करावी.

श्री.कवरसिंग बैनाडे : शिवाजे महाराज यांचे पूतळया जवळील कांरजे चालू करण्यात यावे तसेच टी. व्ही. सेन्टर चौकातीलही चालू करावे.

मा.सभापती : प्रशासनास सूचना देण्यात येत आहे की यानंतर कोणत्याही थोर महापुरूषांच्या पूतळया भोवती डिजेटल पोस्टर्स दिसून येणार नाही याची खबरदारी घ्यावी. तसेच महापालिकेच्या सार्वजनिक ठिकाणी, आयलॅण्ड वर त्याच प्रमाणे उद्यानात कोणतीही जहीरात असेल. पोस्टर असेल. प्रशासकीय असेल राजकीय असेल ते काढून टाकण्याची कार्यवाही करावी. महापालिकेच्या नियमाप्रमाणे संबधीतावर कार्यवाही करावी. कोणास कोणत्याही ठिकाणी परवानगी दयायची हे महापालिकेने ठरवावे त्याप्रमाणे फिस ठरवून घ्यावी.परवानगी दयावी. विना परवाना कूठेही होर्डीग पोस्टर असून नये. तसेच थोर महापूरूषाच्या स्मारकाच्या जवळ परवानगी देवू नये. प्रशासकीय अधिकारी यांना संपूर्ण होर्डींग्ज काढण्याच्या सूचना देण्यात येत आहेत.

श्री.मुजीब खान : आताच मला एक फोन आलेला आहे. महानगरपालिकेच्या यांत्रिकी विभागाकडे जे पेट्रोल पंप आहे तेथे खाजगीगाडी एमएच २० ई. ९७९६ मधे डिजेल भरण्यात आले. एक नगरसेविकेचा पती आहे अशी माहिती मिळालेली आहे ती गाडी तेथेच उभी आहे.

मा. सभापती : ऐनवेळचे सर्व अंदाजपत्रक असलेल्या विषययास मंजूरी देण्यात येते.

## ऐनवेळचे विषय

*(टीप-कार्यक्रम पत्रिका क्र.२१, दि.१०.१.२००५-लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणे- (विषय क्र.१६६, १६७ व १६८) यापुर्वीच वितरीत केलेली असल्याने ऐनवेळच्या प्रस्तावास **१६९** पासून क्रमांक दिलेले आहेत.)*

**विषय क्र.१६९ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जयसिंगपुरा चौक ते बिबीका मकबरा पर्यंतच्या रस्त्यासाठी फुटपाथ तयार करणेच्या कामासाठी सा.बां.विभागाच्या सन २००४-२००५ च्या दरसूचीनुसार र.रू.११,००,४००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च २००५-०६ या आर्थिक वर्षात शहर सौंदर्यीकरण या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी शिफारस केलेली आहे.

तरी र.रू.११,००,४००/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जयसिंगपुरा चौक ते बिबीका मकबरा पर्यंतच्या रस्त्यासाठी फुटपाथ तयार करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.११,००,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७० :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी सन २००५-०६ सालाकरीता वार्षिक क्लोरीन पुरवठ्या संदर्भात रूपये १८,७९,५००/- चे अंदाजपत्रक सादर केले होते. त्यास मा.आयुक्त महोदयांनी शिफारस केल्यानुसार सर्वसाधारण सभेने मंजूरी दिली आहे.

वार्षिक क्लोरीन पुरवठ्या संबंधी निविदा प्रक्रिया करण्यात आली. निविदा प्रक्रिये अंतर्गत राज्यस्तरीय नियतकालीकातून निविदा प्रसिध्द करण्यात आली. या पुरवठ्याकरीता एकुण तीन निविदा विक्री झाल्या व शेवटच्या प्राप्तीच्या दिवशी तिन्ही निविदा प्राप्त झाल्या. या तीन निविदा व त्यांचे प्राप्त दर खालील प्रमाणे आहेत.

| | पुरवठ्याचा दर | टनर दुरूस्ती दर |
|---|---|---|
| १. मे.फोनिक्स केमिकल्स | रू.१३,२४१/- प्रति टन | रू.७००/नग |
| २. मे.पुष्पतारा सर्व्हिसेस | रू.१४,३००/- प्रति टन | रू.५५००/नग |
| ३. मे.राजदिप इंटरप्रायझेस | रू.१४,२७७/- प्रति टन | रू.५१००/नग |

वरीलप्रमाणे प्राप्त निविदांचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता मे.फोनिक्स केमिकल्स, औरंगाबाद यांचा दर सर्वात कमी म्हणजेच रूपये १३,२४१/- प्रति मे.टन असा असून, टन दुरूस्तीकरीता रूपये ७००/- प्रति नग असा सर्वात कमी दर प्राप्त आहे. सदरच्या दराने एकूण पुरवठा व दुरूस्ती करीता रूपये २२.१४ लक्ष खर्च अपेक्षीत आहे. सदरच्या दराने खरेदी करण्याची शिफारस मा.आयुक्त महोदय यांनी केली आहे.

उपरोक्त निविदे अंतर्गत वार्षिक क्लोरीन खरेदीसाठी मे.फोनिक्स केमिकल्स, औरंगाबाद यांचा दर सर्वात कमी म्हणजेच रूपये १३,२४१/- प्रति मे.टन या दराने खरेदी करावयाचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २००५-०६ सालाकरीता वार्षिक क्लोरीन पुरवठ्यासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकृदष्ट्या सर्वात कमी म्हणजेच रू.१३,२४१/- प्रति टन(क्लोरीन पुरवठा दर) व टनर दुरूस्तीसाठी रू.७००/- प्रति नग या दराची मे.फोनिक्स केमिकल्स, औरंगाबाद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७१ :**

(दि.२२.१२.२००५च्या सभेतील स्थगित केलेला ठराव क्र.१५१)

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहरातील काही मुख्य रस्ते तसेच महत्वाचे विकास योजना रस्ते Deffered Payment धर्तीवर रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे (डांबरी रस्ते) प्रस्तावित आहे.

प्रस्तावित रस्त्यांचे सर्वेक्षण करणे, तसेच रस्त्याचे खठ्ठ व खड तसेच तत्सम कोडप्रमाणे डिझाईन करणे, कामाचे अंदाजपत्रक तयार करणे, तसेच निविदापूर्व व निविदा काढल्यानंतर सर्व प्रक्रियेत महानगरपालिकेचे तांत्रिक सल्लागार म्हणून काम पहाणे, यासाठी मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांच्या दालनात दि.५.१०.२००५ रोजी PMC चे प्रतिनिधी हजर होते. सदर बैठकीत सर्व प्रतिनिधींना त्यांच्या फर्मची माहिती तसेच कामाच्या अनुभवाबाबत माहिती असलेली पुस्तिका सादर करण्याबाबत सुचविले. त्यानुसार श्रीखंडे कन्सल्टंट, मुंबई व सनग्रेस इंजिनियरींग प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड, पुणे यांनी त्यांच्या फर्मची माहिती व अनुभवाबाबत माहिती पुस्तिका सादर केलेली असून सदर माहिती पुस्तिकेवरून श्रीखंडे कन्सल्टंट मुंबई, यांना रस्ते बांधकामाकरीता झचउ म्हणून भरपुर अनुभव दिसून येतो. सनग्रेस इंजिनियरींग प्रोजेक्ट प्रा.लि. यांना पाटबंधारे कामाचा भरपूर अनुभव आहे. या बाबी विचारात घेता श्रीखंडे कन्सल्टंट प्रा.लि. मुंबई यांना झचउ म्हणून नेमणूक करणे योग्य राहील.

Deffered Payment धर्तीवर खालील रस्त्यांचे डांबरीकरण (डांबरी रस्ते) करण्याचे प्रयोजन आहे. सदर रस्त्यांची यादी खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | रस्त्याचे नांव | अंदाजेलांबी (मीटर) |
|---|---|---|
| १ | एकता चौक ते सुतगिरणी चौक (८०' रूंद रस्ता) | ११०० |

| | | |
|---|---|---|
| २ | पीरबाजार ते एकता चौक (८०' रूंद रस्ता) | १२०० |
| ३ | हॉटेल पंचवटी ते कोकणवाडी (८०' रूंद रस्ता) | ७५० |
| ४ | सावरकरचौक (टिळकनगर) ते जवाहरनगर पोलीस स्टेशन(८०' रूंद रस्ता) | १४०० |
| ५ | शहागंजचमन सभोवतालचा रस्ता (८०' रूंद रस्ता) | ५०० |
| ६ | रोशनगेट ते सेंट्रल जकात नाका (१००' रूंद रस्ता) | ९५० |
| ७ | समर्थनगर ते सिल्लेखाना (८०' रूंद रस्ता) | ९०० |
| ८ | क्रांतीचौक ते पैठणेट (१००' रूंद रस्ता) | १००० |
| ९ | मोंढानाका ते जफरगेट (८०' रूंद रस्ता) | ८०० |
| १० | बीबीका मकबरा ते टाऊन हॉल (१००' रूंद रस्ता) | ११०० |
| ११ | आकाशवाणी ते त्रिमुर्ती चौक | ७०० |
| १२ | एस.एस.सी.बोर्ड ते पीरबाजार (५०' रूंद रस्ता) | ७०० |
| १३ | हॉटेल वेदांत ते आनंद गाडे चौक (८०' रूंद रस्ता) | ९०० |
| १४ | रंगारगल्ली रस्ता (५०' रूंद रस्ता) | ७०० |
| १५ | पैठणगेट ते सिटीचौक व्हाया रंगारगल्ली रस्ता | |
| १६ | सिटीचौक ते गुलमंडी-गोमटेश मार्केट ते पैठणगेट रस्ता | |
| १७ | औरंगपुरा बाराभाई ताजिया ते मिल कॉर्नर रस्ता | |
| १८ | सेव्हनहिल ते गजनन महाराजमंदिर रोड ते सूतगिरणी रस्ता | |
| १९ | एम.जी.एम. - सिडको ते लक्ष्मणचावडी रस्ता | |
| २० | दमडीमहल कलेक्टर ऑफीस ते एसएफएस जलना रोड व्हाया चंपा मस्जेद रस्ता | |
| २१ | हर्सूल कारागृह ते हर्सूल तलावा पर्यन्त रस्ता | |

उपरोक्त रस्त्यांचे Deffered Payment धर्तीवर डांबरीकरण करण्याकरीता अंदाजे रू.२३ कोटी एवढा खर्च येईल व काम पूर्ण झाल्यानंतर काम करणाऱ्या कंत्राटदारास प्रत्येक वर्षी खालीलप्रमाणे एकूण खर्चाच्या खालील टक्केवारीप्रमाणे रक्कम देण्यात येईल.

प्रथम वर्ष ३०%
दुसरे वर्ष ३०%
तिसरे वर्ष ४०%

तरी PMC ची नेमणूक करण्यासाठी तसेच नियोजित डांबरीकरण रस्त्याच्या नावांना मंजुरी मिळणेकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेमध्ये मान्यता मिळणेकरीता मा.स्थायी समितीमार्फत प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील काही मुख्य रस्ते तसेच महत्वाचे विकास योजना रस्ते Deffered Payment धर्तीवर रस्त्यांचे डांबरीकरण करण्यासाठी प्रस्तावित रस्त्यांचे सर्वेक्षण करणे, तसेच रस्त्याचे खठ्ठ व खड तसेच तत्सम कोडप्रमाणे डिझाईन करणे, कामाचे अंदाजपत्रक तयार करणे, तसेच निविदापूर्व व निविदा काढल्यानंतर सर्व प्रक्रियेत महानगरपालिकेचे तांत्रिक सल्लागार म्हणून काम पहाणे, यासाठी श्रीखंडे कन्सल्टंट प्रा.लि. मुंबई यांना झचउ म्हणून नेमणूक करण्यास तसेच प्रस्तावित रस्त्यांचे डांबरीकरण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तथापी सर्वच रस्त्यांचे काम खाजगी संस्थेमार्फत न करता महापालिकेच्या अभियंत्यामार्फत कामे करण्यात यावीत. सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.१७२ :</u>**

(दि.२२.१२.२००५ च्या स्था.स.सभेतील स्थगित ठेवलेला विषय क्र.१५२)

अग्निशमन दलासाठी अग्निशमन साहित्य खरेदीसाठी रू.५० लाख आर्थिक तरतुद वर्ष २००५-०६ साठी ठेवण्यात आलेली आहे.

KDF ४०० - Kirlosker
Pump fuction
Diameter - ३"
Pump delivery
Size - H २१/२ + १#१’
Max head - ७५ M
Max Discharge - ७५० Lit./Min.
Suction Lift - ७ M
Pump Body - Alluminium Alloy

एकूण ४ पंपाकरीता र.रू.२७,४४,०००/-खर्चाचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर आर्थिक खर्चाच्या मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अग्निशमन दलासाठी अग्निशमन साहित्य खरेदी अंतर्गत खरेदी करावयाच्या-

KDF ४०० - Kirlosker
Pump fuction
Diameter - ३"
Pump delivery
Size - H २१/२ + १#१’
Max head - ७५ M
Max Discharge - ७५० Lit./Min.
Suction Lift - ७ M
Pump Body - Alluminium Alloy

वर दर्शविल्यानुसार एकूण ४ पंपाकरीता तयार करण्यात आलेल्या र.रू.२७,४४,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहरातील विविध मुख्य रस्त्यास खडीकरण व डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन २००४-०५ च्या दरसुचीनुसार र.रू.१९,७५,४००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरील कामे आवश्यकतेनुसार करण्यात येतील. या कामाचा खर्च सन २००५-०६ या आर्थिक वर्षात शहर सौंदर्यीकरण या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी शिफारस केलेली आहे. तरी र.रू.१९,७५,४००/- चे अंदाजपत्रकास मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील विविध मुख्य रस्त्यास खडीकरण व डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.१९,७५,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७४ :**

कार्यकारी अभियंता (ड्रेनेज, विद्युत, इमारती व उद्याने) प्रस्ताव सादर करीत आहे की, मनपा प्राणी संग्रहालय येथे पाणघोड्याच्या पिंजऱ्यासाठी बांधकाम करणे बाबतच्या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.विभागाच्या सन २००४-०५ च्या जिल्हा दरसूचीनुसार र.रू.११,०९,९९५/- चे तयार करण्यात आले असून सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि.१३.१२.२००५ नुसार प्रशासकीय मंजुरी दिलेली असून सदर कामासाठी अर्थसंकल्प २००५-०६ मध्ये र.रू.२० लक्षची तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

करीता मनपा प्राणी संग्रहालय येथे पाणघोड्याच्या पिंजऱ्यासाठी बांधकाम करणे बाबतच्या रक्कम रू.११,०९,९९५/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा प्राणी संग्रहालय येथे पाणघोड्याच्या पिंजऱ्यासाठी बांधकाम करणेसाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.११,०९,९९५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७५ :**

कार्यकारी अभियंता (ड्रे., वि., इ. व उ.) प्रस्ताव सादर करीत आहे की, संत एकनाथ रंगमंदिराचे आधुनिकीकरण करणेच्या कामासाठी सा.बां.विभागाच्या सन २००४-०५ च्या जिल्हा दरसूचीनुसार र.रू.१६,६७,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि.३.१.२००६ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सदरील आधुनिकीकरणाच्या कामासाठी अर्थसंकल्प सन २००५-०६ अंतर्गत विकास इमारती शाळा व दवाखाने या लेखाशिर्षकांतर्गत र.रू.२५.०० लक्षची तरतुद करण्यात आलेली आहे. करीता संत एकनाथ रंगमंदिराचे आधुनिकीकरण करणेसाठी र.रू.१६,६७,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत एकनाथ रंगमंदिराचे आधुनिकीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.१६,६७,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जिल्हाधिकारी कार्यालय ते मजनुहिल मुख्य रस्त्यावर फुटपाथसाठी पेव्हींग करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन २००४-०५ च्या दरसुचीनुसार र.रू.१९,२०,६००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन २००५-०६ या आर्थिक वर्षात शहर सौंदर्यीकरण या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी शिफारस केलेली आहे. तरी र.रू.१९,२०,६००/- चे अंदाजपत्रकास मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालय ते मजनुहिल मुख्य रस्त्यावर फुटपाथसाठी पेव्हींग करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.१९,२०,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१७७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग-अ ते प्रभाग-फ अंतर्गत विविध मुख्य रस्त्यांचे फुटपाथ बांधणेच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन २००४-०५ च्या दरसुचीनुसार र.रू.१९,९९,१०७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरील कामे आवश्यकतेनुसार करण्यात येतील. या कामाचा खर्च सन २००५-०६ या आर्थिक वर्षात शहर सौंदर्यीकरण या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी शिफारस केलेली आहे. तरी र.रू.१९,९९०,१०७/- चे अंदाजपत्रकास मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग-अ ते प्रभाग-फ अंतर्गत विविध मुख्य रस्त्यांचे फुटपाथ बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.१९,९९,१०७/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.सभापती : आजची सभा काही वेळासाठी तहकूब करण्यात येते.
(सभेला पुन्हा सुरूवात ४.२० वा.)

<u>संवादः</u>

सौ. लता दलाल : अस्थापना विभागा संबधी माहिती विचारलेली होती. संपूर्ण माहिती देण्यात यावी.

मा. सभापती : उपआयुक्त (प्रशासन) यांनी संपूर्ण माहिती द्यावी.

उपआयुक्त(प्रशासन) : यांत्रिकी विभागात आठ पदे रिक्त असलेली भरावयाची आहे. तसेच आरोग्य विभागात १० पदे रिक्त आहेत. या संदर्भात जी रिक्त पदे आहेत त्या बाबतीत कमेटीची बैठक घेवून मा.आयुक्तांना विनंती करून पुढील आठवड्यात निर्णय घेण्यात येईल. ११२४ मधीलच ही पदे असल्यामूळे त्या अनुषंगानेच विचार केला जईल.

मा.सभापती : सभागृहा पेक्षा समिती मोठी नाही. किती पदे रिक्त आहेत, किती वर्षापासून व ती का भरण्यात आलेली नाही? याचा खूलासा होणे गरजेचे आहे. नोकर भरती करत असतांना ज्या नियमावलीचा वापर केलेला आहे त्यास सभागृहाची मान्यता घेतलेली होती काय तसेच रिक्त पदे भरण्याचे प्रलंबीत का आहे चूक कोणाची आहे संपूर्ण माहिती द्यावी.

उपआयुक्त (प्रशासन) : ११२४ पदामधील रिक्त असलेली पदे भरण्याची कार्यवाही १५ दिवसात करण्यात येईल. एकूण १८ पदे रिक्त आहेत. यात यांत्रिकी विभागातील तीन पदे आहेत.

श्री.मुजेब खान : दैनिक वेतनावर किती कर्मचारी कार्यरत आहेत व केंव्हापासून कार्यरत आहे.

उपआयुक्त(प्रशासन) : विविध विभागात एकूण २६८ कर्मचारी हे विविध पदावर दैनिक वेतनावर कार्यरत असून या पदास मान्यता घेण्यासाठी प्रकरण शासनाकडे पाठविण्यात आलेले आहे.

श्री.मुजेब खान : शासनाने ११२४ पदांना मंजूरी दिलेली होती त्यात डायरेक्शन दिलेले आहेत. पुन्हा मान्यता घेण्याची आवशकता नाही.

उपआयुक्त(प्रशासन) : ११२४ व्यतिरिक्त २६८ कर्मचारी आणखी दैनिक वेतनावर काम करतात.

श्री. मिलींद दाभाडे : ११२४ कर्मचारी भरतीत काही लोकांना दिलेले आदेश परत घेतलेले आहेत.

उपआयुक्त(प्रशासन) : जे नंतरचे होते त्यांना आदेश दिलेले होते हे कमेटीच्या लक्षात आल्यानंतर परत घेतले.

मा. सभापती : जे समिती स्थापन केली त्याबद्दलच शंका येत आहे. नियमाने भरती केलेली नाही.

श्री.कवरसिंग बैनाडे : भरती करतांना जेष्ठ-कनिष्ठ बघीतले नाही. जे समोर आले, ओळखीच्यांना घेण्यात आले. काही कर्मचाऱ्यांना आदेश दिल्यानंतर परत का घेतले.

श्री. मिलींद दाभाडे : पैसे घेवून काही लोकांना भरती केलेले आहे. तसेच जे यांदी केलेली आहे ती चूकीची आहे.

श्री. कवरसिंग बैनाडे : कामगारांचे काम कोणते अधिकारी बघतात. ज्यांची भरती झालेली आहे ते त्या संवर्गात येतात का?

मा.आयुक्त : ११२४ पदांना शासनाने मान्यता दिलेली होती. भरती करतांना ती नियमाने झालेली आहे का, त्यातील १८ पदे भरणे बाकी असून या व्यतिरिक्त ज्या पदावर

अस्थायी कर्मचारी कार्यरत आहेत त्या पदांना शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे का, असा प्रश्न आहे. नावानिशी चौकशी करू शकतो वेळ लागेल.

श्री.मुजेब खान : ११२४ भरती मध्ये जे१९९५ च्या नंतर सेवेत आले त्यांना घेतलेले आहे. परंतू सन ९१-९२ मध्ये कार्यरत असलेले त्यांना घेण्यात आलेले नाही. पुन्हा २६८ कर्मचारी कोणते आहेत. अधिकाऱ्यांचे नातेवाईक यात भरती केलेले आहे.

मा.सभापती : अस्थापना विभागाकडून न्यायालयास जे यादी दिलेली होती त्यानुसार भरती झालेली नाही.

मा.आयुक्त : यासंदर्भात सर्वसाधारण सभेत सुध्दा चर्चा झालेली होती. चौकशीचे आदेश दिलेले होते. ११२४ ची संपूर्ण चौकशी करणे शक्य नाही म्हणून एका संवर्गा मधील पदाच्या संदर्भात चौकशी केली, चूक दिसून आली नाही. नावानिशी पाहिजे असेल तर चौकशी करू शकतो. जे यादी माझ्याकडे स.सदस्य यांनी दिलेली आहे त्या संदर्भात १२ तारखेला माझ्याकडे स. सदस्यांनी जे नांवे अधोरेखीत करून दिलेली आहेत त्या बद्दल चौकशी करता येईल. या व्यतिरीक्त २६८ कर्मचारी दैनिक वेतनावर कार्यरत आहे त्यास शासनाची मान्यता घ्यावी लागेल.

श्री.मुजेब खान : ११२४ पदातील किती लोकांना सेवेत कायम केलेले आहे.

मा.आयुक्त : लाईनमन कॅडरच्या संदर्भात मी चौकशी केलेली होती. त्यातील दोन कर्मचारी यापूर्वीच भरती केलेले होते.

सौ. लता दलाल : ११२४ पदाची मान्यता घेण्यासाठी शासनाकडे पाठविलेले होते. ती मान्यता येण्यापूर्वीच काही पदावर पाणीपूरवठा असेल आरोग्य विभाग असेल येथे नियुक्त्या केलेल्या होत्या. उर्वरीत जेआहे त्यांचेवरच हा अन्याय का होत आहे. ११२४ मधील यादीतील जेहोते त्यांना आज्ही सेवेत कायम केलेले नाही. यात ज्यांच्या ओळखी होत्या, अधिकाऱ्यांचे नातेवाईक होते, नेत्यांचे काही होते त्यांना घेतलेले आहे.

मा. आयुक्त : ११२४ पदांना शासन मंजूरी येण्याच्या अगोदर काहींना घेतले असल्यास, कशाच्या आधारे घेतले याची चौकशी होईल. या व्यतिरिक्त जे दैनिक वेतनावर आहे त्यांचेसाठी शासनाची मंजूरी घेण्याची आवश्यकता आहे असे वाटते.

श्री.मुजेब खान : शासनाने ११२४ पदांना मंजूरी दिलेली आहे त्यात डायरेक्शन दिलेले आहे.

मा. आयुक्त : शासनाचे डायरेक्शन असे आहे की अगोदर ११२४ भरती करावे. त्यात असे होते, ते कर्मचारी कामावर असावेत. शासनाकडे पाठवितांना ११२४ पदांना मान्यता मागविलेली होती त्यानूसार मान्यता आलेली आहे. कमी संख्या शासनाकडे गेलेली होती. नावानिशी चौकशी करण्यात येईल.

श्री. मुजेब खान : न्यायालयाची यादी समोर ठेवली तर लक्षात येईल की कोणत्या लोकांची बोगस भरती केलेली आहे.

श्री. मिलींद दाभाडे : ज्या कर्मचाऱ्याना आदेश दिले होते त्यांचे आदेश परत घेतले परंतू त्यांचे नंतर सेवेत आलेल्यांना कायम स्वरूपी आदेश दिलेले आहे नावासही माहिती देईल.

मा.आयुक्त : ज्यांना आदेश दिले होते त्यांचेकडून परत घेतले, ते का घेतले त्याचीही चौकशी केली जईल.

सौ.लता दलाल : रिक्त पदे किती आहे. किती पदावर प्रभारी म्हणून कार्यरत आहे वेगवेगळया संवर्गातील किती पदे रिक्त आहे. याचा खूलासा करावा. रिक्त पदे भरण्यास शासनाची मनाई आहे काय?

मा.सभापती : नोकर भरती बाबत चर्चा केलेली आहे. जे प्रश्न उपस्थित केलेले आहे शासनाकडून जे परीपत्रक आलेले होते त्यानूसार नोकर भरती केलेली आहे असा खूलासा केलेला आहे. अनेक पदे रिक्त असून अतिरिक्त कार्यभार कर्मचारी/अधिकारी यांचेकडे दिलेला आहे. कोणत्याही पदाचा अतिरिक्त कार्यभार हा सहा महिन्यापेक्षा जस्त दिवस ठेवता येत नाही. परंतू या नियमाचे पालन केलेले दिसून येत नाही. अनेक पदावर तीन चार वर्षापासून अतिरिक्त कार्यभार म्हणून काही अधिकारी, कर्मचारी काम करतात. या सभागृहाच्या अशा भावना झाल्या आहेत की प्रशासन हे त्यांचे सोयीनूसार चालते. नियमाचे पालन करीत नाही. काही पदांना शासनाने ४ ते ६ वर्षापूर्वी मान्यता दिलेली असतांना ती पदे भरण्याची कार्यवाही झालेली नाही. जी काही रिक्त पदे आहे ती भरण्याची कार्यवाही मा.आयुक्तांनी करण्याची गरज आहे. रिक्त पदे किती दिवसासाठी रिक्त ठेवता येतात व का ठेवलेले आहे हा प्रश्न आहे. शासनाचे जे डायरेक्शन आहे तसेच मा.न्यायालयाचे जे डायरेक्शन आहे त्याचे उल्लंघन होत आहे असे वाटते. पदे भरतांना न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे जेष्ठता यादी करावी. जे दैनिक वेतनावर कर्मचारी आहे त्यांचेमधून जी जी पदे रिक्त होतील त्यावर भरती करावे. असे मा. न्यायालयाचे आदेश आहे. परंतू नोकर भरती करतांना जणीवपूर्वक प्रशासनाकडून चूक झालेली आहे. व्यक्ती बघून भरती होते की नियम बघून या दोन्ही बाबींचा उपआयुक्त यांनी ज्यांचेवर अन्याय झालेला आहे त्या सर्वाच्या बाबतीत खूलासा करावा.

उपआयुक्त, प्रशासन : महापालिका अस्थापनेवर विविध ११ पदावर अतिरिक्त कार्यभार सोपविलेले आहे. अब्दूल फारूक खान उपअभियंता ड्रेनेज, २००५ पासून, श्री.मालोदे सन २००५ पासून, श्री.निकम यांचेकडे सहाय्यक आयूक्त-२ चा कार्यभार दि.१५.१०.२००५ पासून, तसेच डी. डी. सुर्यवंशी यांचे कडे १८.१०.२००५ पासून तर श्री.सिरसाट ७.२.१९९८ पासून अतिरिक्त कार्यभार आहे.

मा.सभापती : ६ महिन्यापेक्षा जस्त कालावधीसाठी अतिरिक्त कार्यभार सभागृहाच्या मान्यते शिवाय देवू शकतो का याचा खूलासा करावा.

उपआयुक्त(प्रशासन) : सहा महिन्यापर्यत अतिरिक्त कार्यभार दिला तर भत्ता देय असतो. त्यापेक्षा जस्त कालावधीसाठी अतिरिक्त कार्यभार द्यावा असे शासनाचे सूचना नाहीत. कार्यालयाच्या सोयीसाठी दिला जतो. परंतू सहा महिण्यानंतर जे अतिरिक्त भत्ता असतो तो दिला जत नाही.

मा.सभापती : अतिरिक्त कार्यभार वाढविण्यासाठी सभागृहाची मान्यता लागते की नाही? अतिरिक्त कार्यभार जेंव्हा दिला जतो त्याची माहिती सभागृहाला दिली जत नाही.

उपआयुक्त(प्रशासन) : मा.आयुक्त हे प्रशासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी सक्षम ॲथॉरिटी आहे, त्यामूळे सभागृहाची मान्यता लागत नाही असे माझे मत आहे. नियम ६७(३)बी मध्ये प्रशासकीय बदल करण्याचे अधिकार आयुक्तांचे आहेत. शासनाने मंजूरी दिलेल्या पदास किती दिवस रिक्त ठेवू शकतो. सात वर्षापासून काही पदे रिक्त असून का भरलेली नाही.

मा.आयुक्त : कोणतेही पद सहा महिने रिक्त राहिल्यास लॅप्स होते. पून्हा सहा महिण्यानंतर शासनाची मान्यता लागते.

मा.सभापती : अनेक पदांना शासनाने मंजूरी दिलेली आहे. सहा महिने झाले का भरलेले नाही? यात दोष कुणाचा आहे. जेदोषी असतील त्यांचेवर कार्यवाही करणार का?

सौ. लता दलाल : कोणती पदे रिक्त आहेत व किती वर्षापासून रिक्त आहेत, भरलेली नाही. आर्थिक तरतूद नव्हती का, स्थायी समितीची परवानगी नव्हती का, किंवा मा.आयुक्त सक्षम नव्हते का किंवा सक्षम उमेदवार मिळत नव्हते का, या सर्व बाबीचा खुलासा करावा. सहा महिण्यात शासनाने मंजूरी दिल्यानंतर न भरलेली पदे किती आहे किती पदे लॅप्स झालेली आहे व कोणकोणती पदे आहेत.

उपआयुक्त(प्रशासन) : विविध रिक्त पदाचा गोषवारा आताच दिलेला आहे. विधी सल्लागार हे पद १९९८ पासून रिक्त आहे. त्याबाबत २००३ मधे पद भरण्याची कार्यवाही झालेली होती. शासनाने सन २००२ पर्यत पदे भरण्यावर स्थगिती दिलेली होती.

सौ. लता दलाल : रिक्त झालेली पदे कोणती होती व केंव्हापासून होती व का भरल्या गेलेली नाही हा खुलासा अपेक्षीत आहे. रिक्त जगा भरण्यासाठी सुरूवातीच्या सहा महिण्यात का प्रयत्न केलेले नाही.

श्री. रेणुकादास वैद्य : काही वेळेस शासकीय नियम काही वेळेस आर.आर. नूसार कार्यवाही होते, हे योग्य नाही. जेष्ठता यादी न्यायालयाने ठरविलेली किंवा कार्यालयाने तयार केलेली याप्रमाणे कार्यवाही होते .हे योग्य वाटत नाही.

श्री. मिलींद दाभाडे : ज्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीमुळे पदे लॅप्स झालेली आहेत त्यांचेवर कार्यवाही करण्याची तरतूद आहे का मा. आयुक्तांनी खूलासा करावा.

मा.आयुक्त : मधल्या काळात शासनाची पदे भरण्यास स्थगिती होती. परंतू कोणतेही पद ७ वर्ष रिक्त ठेवणे योग्य नाही.

सौ. लता दलाल : नवीन पदे भरण्यासाठी शासनाची स्थगिती असेल परंतू रिक्त पदे भरण्यास नसेल अशी माझी माहिती आहे. सहा महिण्यात रिक्त असलेले पद लॅप्स होत असेल तर शासनाने नियम पाळणार कि महापालिकेचे याचाही खूलासा करावा.

मा.आयुक्त : तीन चार वर्ष शासनाची पदे भरण्यास स्थगिती होती.

उपआयुक्त प्रशासन : सन २००२ पर्यत स्थगिती होती.

मा.सभापती : सन २००२ ला चार वर्ष होत आहे रिक्त पदे का भरलेली नाही?

मा.आयुक्त : जेंव्हा वार्ड कमेटी करण्यात आलेल्या आहे त्यावेळी वार्ड अधिकारी यांची गरज होती. झोन अधिकारी संवर्गात पाच लोकांना पदोन्नती द्यायची होती. आर.आर मधे तरतूद आहे परंतू खालचे कर्मचारी कार्यरतच नाही. तर पदोन्नती कशी देणार असा प्रशन पडला. अग्निशमन विभागातील एका कर्मचाऱ्यास प्रमोशन देण्यात आलेले आहे. एकाच वेळी दोन पदोन्नती देता येत नाही. सन २००३ मधे नोटफिकेशन काढले त्यानंतर काही लोक कोर्टात न्याय मागण्यासाठी गेले. शासनाचे स्थगिती आदेश उठल्यानंतर निवडणूका झाल्या. जेव्हढी पदे रिक्त आहे ती ताबडतोब भरली पाहिजे

सौ. लता दलाल : जेसीबी वाहन चालकांची पदे रिक्त होती ती का भरलेली नाही.

मा.आयुक्त : काही पदे न भरता व्हॅकेन्ट ठेवायची मी सांगितलेले आहे त्याचे कारण असे की,जे काही २६८ कर्मचारी काम करतात त्यांचे पदांना शासनाची मान्यता लागेलच. शासनाने ११२४ पदांना मंजूरी दिलेली होती. जे कार्यरत होते त्यांना घेतलेले आहे. परंतू जे २६८ पदावर कर्मचारी काम करतात त्याचे पदास मान्यता घेण्याची परवानगी मागविलेली आहे. त्याचे अगेन्स्ट ही पदे भरण्याची परवानगी

द्यावी. काही पदे रिक्त आहे त्यासाठी २६८ कर्मचाऱ्यापैकी कूणीतरी असेल परंतू त्यासाठीही शासनाची मान्यता लागते. या रिक्त पदावर दैनिक वेतनावरील कर्मचारी घेण्यासाठी शासनाचे आदेश आणू शकतो. वाहनचालकाची ७ पदे रिक्त असून कर्मचारी ११ आहे. त्या पदावर भरण्याची मान्यता दयावी म्हणून शासनाकडे मागणी करू शकतो. कुणामूळे पदे रिक्त राहिलेली आहे याची जबाबदारी फिक्स करू शकता. स्थायी समिती निर्णय घेवू शकते.

सौ. लता दलाल : जी पदे लॅप्स झालेली आहे ही जबाबदारी कुणाची होती व जेकर्मचारी या पदावर घेणार होते त्यांचेवर अन्याय झालेला आहे असे वाटते. २६८ कर्मचारी आज्ही दैनिक वेतनावर काम करतात शासनाची मंजूरी घेणार, पून्हा याप्रमाणे या कर्मचाऱ्यावर अन्याय करणार काय?

मा.आयुक्त : जेव्हा दैनिक वेतनावर कर्मचारी घेतले जतात. त्यात तीन बाबीचा विचार करून त्यांना कायम केले जते. त्याचे वय , शासनाकडे अशी मागणी केली जते की ज्या वेळेस हे कर्मचारी सेवेत कार्यरत झाले त्यावेळेचे वय बघीतले जवे. जहीरात न देता डायरेक रिक्त पदावर घेण्यासाठी शासनाचे डायरेक्शन मागविले जते.

सौ. लता दलाल : अतिरिक्त कार्यभार दिल्यानंतर विकास कामावर त्याचा परीणाम होतो.

मा.आयुक्त : रिक्त पदावर दैनिक वेतनावरील कर्मचारी भरती करावयाचे असेल तर मला अधिकार नाही, शासनाची परवानगी लागेल. २६८ पदास शासनाची मान्यता घेण्याचे प्रयत्न प्रशासनाचे चालू आहे.

श्री. रेणूकादास वैद्य : गेल्या वर्षभरापूर्वी काही पदे भरण्यास मान्यता दिलेली होती. कार्यवाही झालेली दिसून येत नाही. पून्हा फेब्रुवारी महिण्यात पोटनिवडणूकीची आचारसंहिता लागेल ते प्रलबीत राहिल.

श्री.मुजीब खान : ११२४ पदाच्या मंजूरीतील १८ पदे रिक्त आहे. ते केंव्हा भरणार आहेत .

मा.आयुक्त : एक महिण्यात कार्यवाही होईल.

मा.सभापती : प्रशासनाकडून काही चूका झालेल्या आहे हे मान्य करीत असतांना काही बाबी बरोबर आहे हे मान्य केलेले आहे. संपूर्ण नोकर भरती प्रकरण हे शंकास्पद असल्यामूळे या संपूर्ण प्रकरणाची सविस्तर चौकशी होण्याची गरज आहे. कारण कोणत्याही पदास शासनाची मान्यता आल्यानंतर सर्वसाधारण सभेत पद भरण्यासंदर्भात मान्यता घेणे आवशक आहे. याची नोंद प्रशासनाने घ्यावी. तसेच जे उत्तर उपआयुक्त(प्रशासन) यांनी दिलेले आहे ते संयुक्तीक वाटत नाही. काही पदासाठी शासनाची पून्हा मान्यता घ्यावी लागेल असे आयुक्तांनी म्हटले आहे. परंतू पहिल्या ज्या चूका झालेल्या आहे. कोणत्या कलमाखाली नोकर भरती केलेली आहे. रिक्त पदे का भरलेली नाही. ह्या सर्व बाबी संशयास्पद असल्यामूळे सविस्तर चौकशी करून अहवाल घेण्याची आवश्यकता आहे. अस्थापना विभागाची संपूर्ण चौकशी करण्याच्या संदर्भात श्री.कमलाकर फड, कर निर्धारक व संकलक यांनी चौकशी करावी. त्यांना चौकशी कामी जे माहिती, दस्तावेज आवश्यक आहे ती उपआयुक्त(प्रशासन) यांनी उपलब्ध करून द्यावी व संबधीत विभागाने माहिती दिली नाही तर त्या विभागाचे अधिकाऱ्यावर हे सभागृह कार्यवाही करेल व त्याची अंमलबजवणी मा.आयुक्त यांना करावी लागेल. श्री. कमलाकर फड, कर निर्धारक व संकलक यांनी १५ दिवसात चौकशी करून अहवाल सभागृहासमोर सादर करावा.

'राष्ट्रगिता'नंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद